(१)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
कार्यासन क्रमांक पु. ५
दिनांक १२/४/०६
नस्ती क्रमांक ...
अनुक्रमांक ...

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

क्र.मजीप्रा/सस/आस्था-४/ ४०३

दिनांक : १० एप्रिल, २००४

विषय : **दिनांक २८ मार्च, २००६ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०३ व्या सभेचे इतिवृत्त.**

दिनांक २८ मार्च, २००६ रोजी संध्याकाळी ४.०० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०३ वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी यासोबत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

**सोबत : इतिवृत्त**

**( माधव दोमकोंडवार )**
**सदस्य सचिव**

**प्रधान सचिव,**
**पा.पु. व स्व.विभाग :**

**मा. मंत्री,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता,**
**तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. :**

B.M.103/57

(२)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२१३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

जा.क्र.मजीप्रा/सस/बैठक-१०३/४८/आ-४.

दिनांक : २४.४.२००६

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सहअध्यक्ष,मंत्रालय, मुंबई-३२
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (सुधारणा), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (उर्जा ) उद्योग, उर्जा व कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई-३२
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१

**विषय :** मंगळवार दिनांक २८.३.२००६ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०३ व्या सभेचे इतिवृत्त..

महोदय,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दिनांक २८.३.२००६ रोजी झालेल्या १०३ व्या सभेचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यात येत आहे. सदर इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास, ते या कार्यालयास कृपया त्वरीत कळवावेत.

सदर अभिप्राय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यांत येतील.

आपला विश्वासू,

( **सु.पु. भातखंडे** )
मुख्य प्रशासकीय अधिकारी

**सोबत :**१०३व्या सभेचे इतिवृत्त

..२..

**प्रत,**

**वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.**

आपणास विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील **कार्यक्रम बाब क्र. ३,४,१३,१६,१९,२३,२४ वर** सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ततेचा अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

**अधीक्षक अभियंता, (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई.**

आपणास सूचित करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधीत असलेल्या पुढील **कार्यक्रम बाब क्र. ८,११, १२, १४,१५,१७,२०,२१,२२,२५**वर सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

**अधीक्षक अभियंता, (मुख्यालय), म.जी.प्रा. नवी मुंबई.**

आपणास सूचित करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधीत असलेल्या पुढील **कार्यक्रम बाब क्र. ५ व १०** वर सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

उप मुख्य लेखा अधिकारी - १/२/, म.जी.प्रा., नवी मुंबई.

**आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. नवी मुंबई.**

आपणास सूचित करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधीत असलेली बाब क्र.**६,७,९ व** १८ वर सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

प्रशासकिय-नि-आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

कक्ष / कार्यासन अधिकारी, आस्थापना-१/२/३/४.

**वरील संबंधीत अधिका-यास विनंती करण्यांत येते की, आपल्या कक्षासंबंधी असलेल्या संबंधीत कार्यक्रम बाबीवर त्वरीत कार्यवाही करुन कार्यपुर्ती अहवाल आ-४ शाखेकडे पाठवावेत.**

nng..Sabha..

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०३ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०३ वी सभा मा. मंत्री, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८ मार्च, २००६ संध्याकाळी ४.०० वाजता संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री.अजित पवार, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा. श्री. रणजित कांबळे, राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३. श्री. विश्वास धुमाळ, प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
४. श्री. माधव दोमकोंडवार, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.
५. श्री. जे. एम. फाटक, प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
६. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांचे वतीने श्री. शि. म. म्हात्रे, (उप सचिव वित्त) वित्त विभाग.

**या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

१. डॉ. संजय दहासहस्त्र, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., ठाणे.
२. श्री. राजेंद्र होलानी, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., पुणे.
३. श्री. हेमंत लांडगे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागपूर.
४. श्री. प्र. वा. पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
५. श्री. बी. एस. पाटील, उप-मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
६. श्री. अनिल मुळे, मुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर.(आमंत्रित)

मा. मंत्री, जलसंपदा, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०२व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक २५ जानेवारी, २००६ रोजी झालेल्या १०२ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. २ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०२व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती.**

मजीप्राच्या १०२ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले होते त्या निर्णयांच्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास माहिती करुन दिली. सर्वसाधारण चर्चेनंतर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणुकीस मान्यता मिळणेबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव तसेच वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. कार्यक्रम बाबीस जोडलेल्या दिनांक १.१.२००६ ते २२.३.२००६ या कालावधीत जास्तीत जास्त व्याज दर देणाऱ्या बँकांतर्गत वेगवेगळया कालावधीकरिता करण्यात आलेल्या गुंतवणूकीस मान्यता प्रदान करण्यात आली. सदरची मान्यता प्रदान करताना यापुढे गुंतवणूक करताना वित्त विभागाच्या दिनांक १३ मार्च, २००६ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या सर्व बाबींचा विचार करुन त्याप्रमाणे गुंतवणूक करावी. पुढील बैठकीत गुंतवणूकीबाबत सादर करावयाच्या कार्यक्रम बाबीमध्ये शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वानुसार गुंतवणूक केल्याबाबतचे प्रमाणपत्र नमूद करणे आवश्यक असलेबाबतचे निर्देश मा. अध्यक्ष महोदय यांनी दिले.

**कार्यक्रम बाब क्र. ४ : सिल्लोड वाढीव पाणी पुरवठा योजनेवरील शिल्लक राहिलेले आयुर्विमा कर्ज सद्यःस्थितीला प्रगतीपथावर असलेल्या पुनर्रचित वाढीव सिल्लोड पाणी पुरवठा योजनेवर वळते करणे व अखर्चित कालावधीसाठीची कर्जावरील व्याज माफ करणे..**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. मा.उपाध्यक्ष यांनी उपरोक्त बाब ही १०१ व्या बैठकीत चर्चीली गेली असून या कामी लागणाऱ्या विलंबाबाबत नाराजी व्यक्त केली. या बाबीवर सखोल चर्चेनंतर सिल्लोड वाढीव पाणी पुरवठा योजनेवरील अखर्चित आयुर्विमा कर्ज रु. १३४.६० लक्ष सिल्लोड

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

पुर्नरचित पाणी पुरवठा योजनेवर ऑगस्ट-१९९८ पासून वळते करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याबाबतचा आवश्यक तो सर्वसाधारण सभेचा ठराव संबंधित नगरपालिकेकडून प्राप्त करुन घेण्याचे ठरले. सदरची कर्ज उभारणी ही सन १९९४-९५ मध्ये झालेली असल्याने उपरोक्त कर्जापोटीची रु.१३४.६० लक्ष इतकी रक्कम ऑगस्ट-१९९८ पर्यंत प्राधिकरणाकडे अखर्चित राहीली. त्या अनुषंगाने ६% इतक्या दराने या अखर्चित रकमेवर दिनांक ३०.३.१९९५ ते ३१ जुलै, १९९८ या ४० महिन्यांच्या कालावधी करिता येणारे व्याज रु.१०.३२ लक्ष इतकी रक्कम नगरपालिकेकडून थकित असलेल्या रकमेंतर्गत समायोजीत करण्यास **एक खास बाब म्हणून मान्यता** देण्यात आली. त्या अनुषंगाने नगरपालिकेकडे थकबाकीपोटी सुधारीत मागणी पाठविण्यात यावी. नगरपालिकेने उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे समायोजनानंतर उर्वरित थकबाकीची रक्कम प्राधिकरणाकडे तात्काळ भरणा करण्याचे बंधनकारक राहील. **ही बाब फक्त सिल्लोड नगरपालिकेपुरतीच मर्यादित असून इतर नगरपालिकांना तसेच महानगरपालिकांना अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांना अशी सवलत देता येणार नाही.**

**कार्यक्रम बाब क्र. ५ : कंत्राटदाराच्या नोंदणीचे / नुतनीकरणाच्या निकषांमध्ये कंत्राटदाराने केलेल्या कामाची वार्षिक उलाढाल व हाती असलेल्या कामाच्या रकमेमध्ये शिथिलता देणेबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली असता, त्यावर कंत्राटदारांना नोंदणी करताना कोणत्याही प्रकारची सुट देण्यात येऊ नये व कंत्राटदारांना नोंदणीकरिता मजीप्राच्या प्रचलित नियमानुसारच आवश्यक त्या बाबींची पूर्तता करणे आवश्यक असलेबाबतचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

**कार्यक्रम बाब क्र. ६ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या क्षेत्रिय वर्ग-४ संवर्गातील कार्यव्ययी आस्थापना /रुपांतरीत अस्थाई/स्थाई आस्थापनेवरील रु.२५५०-५५-२६६०-६०-३२०० या वेतन श्रेणीतील संवर्गातील "जलसेवक" हा संवर्ग निर्माण करणेबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. त्यावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन प्रस्तावित केल्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या क्षेत्रिय पाणी पुरवठा केंद्रामध्ये कार्यरत असलेल्या व कार्यक्रम बाबी सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या एकूण १४ संवर्गातील पदे ज्यांची वेतनश्रेणी रु.२५५०-३२०० आहे अशा कर्मचाऱ्यांना **"जलसेवक"** या संवर्गात एकत्रित आणण्यास मान्यता देण्यात आली. तथापि, असे करत असताना या संवर्गाकरता आवश्यक तो **कार्यभार**

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

तक्ता (Duty List) तयार करुन कार्यालयीन तसेच पाणी पुरवठा विषयीचे आवश्यक ते काम या संवर्गातील कर्मचाऱ्यांना करणेबाबतच्या सूचना सदस्य सचिव यांनी निर्गमित कराव्यात असे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र. ७ : उस्मानाबाद येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संपादीत जागेवर विभागीय कार्यालयासाठी शेड बांधण्यास मंजूरी देणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. प्राधिकरणाच्या ताब्यात असलेली सदरची जागा ही उस्मानाबाद-तुळजापूर या रस्त्यावर असून सदरचा भाग जलदरित्या विकसीत होत असल्याने सदरच्या जागेवर कार्यालय बांधण्यास परवानगी प्रदान करण्यात आली. सदरच्या जागेवर कार्यालयीन इमारती करिता शेड ऐवजी सुबक आर.सी.सी. बांधकाम करण्यात यावे जेणेकरुन भविष्यात देखभाल व दुरूस्तीचा खर्च वाचविता येईल. सदरची कामे हाती घेण्यापूर्वी प्राधिकरणाच्या ताब्यात असलेल्या जागेचा भविष्यात पुरेपूर उपयोग करता येईल याबाबत एकूण जागेचे योग्य ते नियोजन प्रथम करण्यात यावे. तसेच महामार्गाचे चौपदरी रुंदीकरण अपेक्षित धरुन योग्य तो Set Back ठेवावा असे निर्देश मा.अध्यक्ष महोदय यांनी दिले. उपरोक्त कामे प्रस्तावित केल्याप्रमाणे रु.१५.१४ लक्ष या मर्यादेतच करण्यास परवानगी प्रदान करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ८ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भंडारा विभाग व उप-विभागासाठी प्रशासकीय इमारत बांधकामाबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव तसेच मुख्य अभियंता, मजीप्रा, नागपूर यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. प्राधिकरणाच्या ताब्यात असलेल्या सदरच्या जागेवर ६००० चौरस फूट विभागीय तसेय उप-विभागीय कार्यालय बांधण्यास व इतर अनुषंगिक कामे रु.४३.१६ लक्ष पर्यत करण्यास परवानगी प्रदान करण्यात आली. उपरोक्त इमारतीचे बांधकाम अत्यंत गुणवत्तापूर्वक व सुबक अशारितीने हिवाळी अधिवेशनापर्यत पूर्ण करणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी निर्देश दिले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ९ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी कर्मचाऱ्यांना "संवाद कौशल्य" (C.S.) आणि ग्रामिण सहभागी अभ्यास (P.R.A.) या विषयावरील प्रशिक्षण देण्यासाठी निधी मंजूर करणेबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीविषयी प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. व सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. कार्यक्रम बाबी अंतर्गत नमूद केल्याप्रमाणे मजीप्राचे अधिकारी / अभियंता / कर्मचारी यांचेकडे IEC क्षेत्रात काम करण्याची क्षमता असल्याने मजीप्रा सहाय्यकारी संस्था म्हणून काम करु शकते. या बाबीचा विचार करुन मजीप्राकडील अभियंता / इतर आवश्यक कर्मचाऱ्यांना व अभियंत्यांना सहभागी ग्रामीण अभ्यास (PRA) व संवाद कौशल्य (Communication skill) या दोन विषयांबाबत द्यावयाच्या प्रशिक्षणाकरिता लागणाऱ्या रु.६ लक्ष खर्चास मान्यता देण्यात आली. हा खर्च हुडकोकडून मिळणाऱ्या कर्जाच्या ०.२५% संशोधन व विकास निधीतून करण्यासही मान्यता देण्यात आली. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.१०: ग्रामीण पाणी पुरवठा योजनांकरिता आवश्यक असणारे सी.आय./डी.आय. पाईप्स प्राधिकरणामार्फत पुरविण्याबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची कामे लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने व योजनेवरील खर्च कमीत कमी होण्याच्या दृष्टीने ग्रामीण पाणी पुरवठा योजनांकरिता यापूढील निविदांसाठी आवश्यक असलेले CI & DI Pipes मजीप्रातर्फे उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. अशाप्रकारे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांकरिता पाईप्स पुरवठा करण्यास शासनाची आवश्यक ती मान्यता घेऊन याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.११: महादुला ( तालुका - कामठी , जिल्हा - नागपूर ) वाढीव पाणी पुरवठा योजना - महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची योजना म्हणून हाती घेण्याबाबत.**

सदर कार्यक्रम बाबी विषयी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. उपरोक्त योजना ही नागपूर शहराला लागून असलेल्या व विज निर्मीती केंद्र असलेल्या कोराडी या गावाला लागून असलेल्या महादुला या गावाकरिता असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दृष्टीने फायद्याची राहील असे मा.उपाध्यक्ष यांनी नमूद केले. सविस्तर चर्चे नंतर महादुला (तालुका - कामठी, जिल्हा - नागपूर) वाढीव पाणी

| | |
|---|---|
| मा. अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्व. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीची योजना म्हणून हाती घेण्यास व १०% लोकवर्गणी प्राधिकरणाने त्यांचे स्वनिधीतून खर्च करुन ही योजना कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली. त्यासाठी आवश्यकतेनुसार कर्ज घेण्यासही मान्यता देण्यात आली. तसेच, योजनेची कामे पूर्ण केल्यानंतर सध्या अस्तित्वात असलेली पाणी पुरवठा योजनेची उपांगे ग्रामपंचायती कडून ताब्यात घेऊन नळ कोंडाळे बंद करुन, महादुला व आसपासच्या परिसरातील नागरिकांना खाजगी नळ जोडणी व ग्रूप नळ जोडणी देऊन आर्थिकदृष्टया सक्षम होण्याकरिता लागणारी आवश्यक पाणी पट्टीचे दर कमीत कमी मासिक रु.१००/- म्हणजेच रु.१२००/- वार्षिक खाजगी नळ जोडणी करीता आकारण्यात यावेत व सामुहिक जोडण्यांकरिता प्रत्येकी रु.५०/- घरटी म्हणजेच एका जोडणीला रु.२४००/- वार्षिक या प्रमाणे पाणी पट्टी आकारण्यात यावी असे ठरले. तसेच दरवर्षी या दराअंतर्गत ५ टक्के दरवाढ करण्यात यावी व सदरची दरवाढ मान्य असलेबाबतचा ठराव संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने दिला तरच ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत राबविण्यास व चालविण्यास मान्यता देण्यात आली. याबाबत पुढील कार्यवाही करण्याकरिता सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. १२: पाचगणी वाढीव पाणी पुरवठा योजना, ता. महाबळेश्वर, जि. सातारा, म.जी.प्रा.च्या मालकीची योजना म्हणून हाती घेण्याबाबत.**

सदर कार्यक्रम बाबी विषयी सदस्य सचिव व मुख्य अभियंता, मजीप्रा, पुणे यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, मजीप्रा, पुणे यांनी पाचगणी पाणी पुरवठा योजना ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीची योजना असून सद्यःस्थितीत ही योजना जास्त पंपीग हेडमुळे तोटयात चालत असून वाढीव योजना पूर्ण झाल्यानंतर आज आकारण्यात येत असलेल्या दरानेही ही योजना नफ्यात चालेल असे नमूद केले. ही योजना मजीप्रामार्फत चालविण्याकरिता तसेच योजनेची कामे हाती घेण्याकरिता नगरपरिषदेच्या ठरावाची अपेक्षा न करता व त्यानी भरलेली एक पंचमांश लोकवर्गणी त्यांना परत करुन, सध्याच्या योजनेप्रमाणे पाचगणी वाढीव पाणी पुरवठा योजना मजीप्राच्या मालकीची योजना म्हणून हाती घेण्यास व त्या करिता आवश्यक ती १०% लोकवर्गणी मजीप्राने भरण्यास मान्यता देण्यात आली. त्यासाठी आवश्यकते प्रमाणे मजीप्राने कर्ज उभारण्यासही मान्यता देण्यात आली. तसेच या योजनेची कामे पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत या योजनेचा ताबा नगरपरिषदेला घेता येणार नाही असे ठरले. या बाबतची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१३: पंढरपूर नगर परिषदकडे असलेल्या थकबाकीबाबत.**

सदर कार्यक्रम बाबी विषयी सदस्य सचिव व मुख्य अभियंता, मजीप्रा, पुणे यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास करापोटी (Taxation) नगरपरिषदेस सुमारे रु. ११५ लक्ष इतके देणे असलेबाबत मुख्याधिकारी यांनी निदर्शनास आणून दिले. तथापि, करापोटी फक्त रु.४५ लक्ष देणे आहेत असे मजीप्राचे अधिकारी सांगतात असे त्यांनी नमूद केले. तरी उपरोक्त रक्कम नेमकी किती याबाबत मुख्य अभियंता, पुणे व मुख्याधिकारी नगरपरिषद, पंढरपूर यांनी पुन्हा एकदा खातरजमा करावी असे ठरले. मुख्याधिकारी , पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर यांनी विनंती केल्याप्रमाणे प्रलंबीत असलेल्या मुद्दलावरील विलंब आकारास १०० टक्के माफी खालील अटींच्या अधीन राहून देण्यात आली.

पंढरपुर नगर पालिकेने करापोटीचे रु. ४५ लक्ष किंवा संयुक्तरित्या खातरजमा केलेली रक्कम मुद्दल रु. १३० लक्ष मधून वळती केल्यानंतर उर्वरीत मुद्दलापोटीची रकमेचा प्राधिकरणाकडे दिनांक ३१.५.२००६ पर्यंत भरणा केला, तर विलंब आकार माफ करण्यात येईल अन्यथा विलंब आकाराबाबत देण्यात आलेली सूट रद्द करण्यात येईल असे ठरले.

याबाबत आवश्यक तो पाठपुरावा करुन उर्वरित मुद्दलाची रक्कम प्राप्त करुन घेण्यास व योग्य ती पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.१४: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे वेणा पाणी पुरवठा केंद्राअंतर्गत देवलामेटी गावाची वितरण व्यवस्था थेट ग्राहकांपर्यंत प्राधिकरणामार्फत राबविण्याबाबत..**

सदर कार्यक्रम बाबी विषयी सदस्य सचिव व मुख्य अभियंता, मजीप्रा, नागपूर यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या वेणा पाणी पुरवठा केंद्रातून सध्या देवलामेटी ग्रामपंचायतीला होत असलेल्या ठोक पाणी पुरवठया ऐवजी देवलामेटी गावातील नागरिकांना किरकोळ ग्राहक म्हणून सध्या ग्रामपंचायत आकारत असलेल्या दरानुसार पाणी पूरवठा करण्यास व प्रत्यक्ष देयके देऊन वसूली करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच हे दर पुढील दोन वर्षात टप्पा टप्पाने वाढवून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उत्पन्न वाढविण्यात यावे असे ठरले. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार सदस्य सचिव यांना देण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१५: खनिज विकास निधी अंतर्गत मंजूरी दिलेल्या आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करावयाच्या पाणी पुरवठा योजनांच्या कामावर ई. ॲण्ड पी. चार्जेस मंजूर करणेबाबत..**

सदर कार्यक्रम बाबी विषयी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ई. ॲण्ड पी. स्वरुपात प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून खनिजकर्म विभागाचे, खनिज विकास कार्यक्रमांतर्गत, रायगड जिल्हयातील सध्या प्रस्तावित असलेल्या रु.७५.३५ लक्ष किंमतीच्या सहा पाणी पुरवठा योजनांकरिता तसेच या कार्यक्रमांतर्गत भविष्यात घ्यावयाच्या पूर्ण ठेव तत्वावरील नळ पाणी पुरवठा योजनांसाठी १७.५% ऐवजी १०% ई. ॲण्ड पी. चार्जेस आकारण्यास मंजूरी देण्यात आली. त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार सदस्य सचिव यांना देण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.१६: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या न्हावा शेवा प्रकल्प क्षेत्र व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या दराचा सन २००६-०७ साठी आढावा..**

सदर कार्यक्रम बाबी विषयी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली असता प्रधान सचिव, पा.पु.व स्व.वि. यांनी न्हावा शेवा, प्रकल्प क्षेत्र व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या दरात दरवर्षी कमीतकमी ५% दरवाढ करण्यात यावी असे सूचविले व त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

केंद्र शासनाचे आयुध निर्माण केंद्राचे पाणी पट्टीचे दर हे आधीच जास्त असल्यामुळे उपरोक्त दरवाढ केंद्र शासनाच्या आयुध निर्माण केंद्राना लागू करण्यात येऊ असे मुख्य अभियंता, पुणे व मुख्य अभियंता, नागपूर यांनी नमूद केले. त्यामुळे यावर्षी ५% दरवाढ करावी व ही दरवाढ आयुध निर्माण कारखान्याकरिता (Defence Water Works) करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठयाच्या दराकरिता लागू राहणार नाही. तसेच विलंब आकाराकरिता आकारावयाचा दर १.५०% वरुन १% दरमहा करण्यास व विलंब आकारावर विलंब आकार न लावण्यास मान्यता देण्यात आली. तथापि, विलंब आकार आकारण्याची तरतूद ही उपविधीमध्ये असल्यामुळे त्यास आवश्यक ती शासनाची मान्यता घेतले नंतरच अमंलात आणावी. त्या अनुषंगाने उपविधीमध्ये आवश्यक ती सुधारणा करुन घेण्यात यावी. जर ग्राहकाने पाण्याचे देयक मिळालेनंतर १० दिवसांच्या आत देयकाची रक्कम भरल्यास त्यास

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

देयकाच्या रकमेच्या २% इतकी सुट देण्यात येईल असा निर्णय यापूर्वी संचालक मंडळाने घेतलेला आहे. त्याच धर्तीवर जर ग्राहकाने पुढील १२ महिन्याच्या पाणी वापराच्या देयकाची रक्कम आगाऊ (Advance Payment) भरल्यास भरलेल्या रकमेवर ५% इतकी सुट देण्यासही मान्यता देण्यात आली. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार सदस्य सचिव यांना देण्यात येत आले.

**कार्यक्रम बाब क्र.१७: कुळगाव बदलापूर, अंबरनाथ शहरासह आयुध निर्माण कारखान्याची कायम स्वरुपी पाणी पुरवठा योजना, भाग-१ योजनेची सुधारित अंदाजपत्रके शासनास सादर करणेबाबत..**

सदर कार्यक्रम बाबी विषयी सदस्य सचिव तसेच मुख्य अभियंता (को.वि.) यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली असता त्यावर मा. अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच प्रधान सचिव यांनी संबंधित विषयावर सविस्तर चर्चा केली. सदर चर्चेत मुख्य अभियंता यांनी दिनांक २६ व २७ जुलै, २००५ रोजी उल्हासनदीला आलेल्या महापूराच्या पाण्याची बदलापूर बॅरेज जवळील २४ मी. पूरपातळी विचारात घेऊन जलसंपदा खात्याच्या केंद्रिय संकल्पचित्र संस्था, (CDO), नाशिक यांनी बंधाऱ्याचे संकल्पन केले असल्यामुळे बंधाऱ्यामुळे येणारा Aflux विचारात घेऊन नदीपात्रामधून पूर वाहून जाण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाय योजना इत्यादी बाबींमुळे मंजूर योजनेतील खर्चात फार मोठया प्रमाणात वाढ होत असल्याचे सांगितले. यावर CDO, नाशिक यांनी केलेल्या संकल्पनात सुधारणा करुन किंमत कमी करता येईल किंवा कसे याबाबत प्रधान सचिव, पा.पु. व स्व.विभाग, यांनी सचिव, जलसंपदा, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व मुख्य अभियंता, म.जी.प्रा., ठाणे यांचे सोबत चर्चा करुन निर्णय घ्यावा असे अध्यक्ष महोदय यांनी निर्देश दिले. त्या अनुषंगाने प्रस्ताव सुधारित प्रशासकीय मान्यतेकरिता शासनास सादर करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच या योजनेकरिता सुधारित प्रशासकीय मान्यता मिळेपर्यंत रु.८.५७ कोटी मंजूर किंमतीपर्यंत स्विकृत निविदेनुसार करावयाची परिमाणे, वाढीव परिमाणे, अतिरिक्त बाबींपोटी होणाऱ्या कामावर खर्च करण्यासही मान्यता देण्यात आली. याबाबतची पुढील सर्व कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.१८: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील पदविका धारक संवर्गात समाविष्ट असणाऱ्या पदवीधर कनिष्ठ अभियंत्यांना सहाय्यक अभियंता (श्रेणी-२) पद देण्याबाबत..**

सदर कार्यक्रम बाबी विषयी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली असता त्यावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन दिनांक ३१.३.२००६ पर्यत मजीप्राच्या अस्थापनेवर भूकंप पुर्नवसन कक्षाकडील तसेच प्राधिकरणाच्या सेवेत रुजू

| | |
|---|---|
| मा. अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्व. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

होतांना जे अभियंते पदविधर आहेत त्यांना त्यांचे नियुक्तीच्या दिनांकापासून व ज्या अभियंत्यानी सेवेत असतांना पदवी प्राप्त केली आहे त्यांना पदवी घेतल्याच्या दिनांकापासून सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य, यांत्रिकी, विद्युत) म्हणून संबोधन्यास संचालक मंडळाची मान्यता देण्यात आली. मात्र त्यांना सहाय्यक अभियंता श्रेणी २ या पदाचे आर्थिक लाभ त्यांना या पदाची नियुक्ती ज्या दिवशी देण्यात येईल त्या दिवसापासून प्राप्त होतील व कोणत्याही प्रकारचा पूर्वलक्षी लाभ थकबाकीच्या स्वरुपात मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत. या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिनियम कलम ८ (१) अ मध्ये आवश्यक ती उचित सुधारणा अथवा दुरुस्ती करण्यासाठी अथवा अधिकची उपसुचना समाविष्ठ करण्यास संचालक मंडळाने शिफारस केली. सदरच्या अधिनियमात दुरुस्तीकरण्यासाठी आवश्यक तो प्रस्ताव शासनास सादर करुन या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.१९: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नवी मुंबई क्षेत्राबाहेरच्या नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र प्रायव्हेट लिमिटेड भागास पाणी पुरवठा करावयाच्या दराबाबत..**

सदर कार्यक्रम बाबी विषयी सदस्य सचिव तसेच मुख्य अभियंता, ठाणे यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली असता त्यावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र प्रा.लि. यांना रु.१३.२५ प्रति १००० लिटर प्रमाणे ९० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा न्हावाशेवा पाणी पुरवठा केंद्रातून करण्यास मान्यता देण्यात आली.

या संबंधीची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.२०: शिरभावी व ८१ गावांची प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता.सांगोला, जि. सोलापूर दैनंदिन देखभाल व दूरुस्तीसाठी मजीप्राने योजना राबवून थेट ग्राहकांकडून पाणीपट्टी वसुली करणे**

सदर कार्यक्रम बाबी विषयी सदस्य सचिव तसेच मुख्य अभियंता, पुणे यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली असता त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यावर माननीय अध्यक्ष महोदय यांनी, प्रस्तावित केलेले वसुलीचे दर व संभाव्य उत्पन्न हे फारच कमी प्रमाणात असुन या योजनेकरिता प्रस्तावित विज रकमेच्या देयकाचा भरणा १०० टक्के शासनाने करावा ही बाब योग्य नसून असे केल्याने राज्यातील इतर भागातूनही अशीच मागणी

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

येईल, त्यामुळे खाजगी नळ जोडणी करिता दारिद्रय रेषेखालील घरांना प्रतिमाह कमीत कमी प्रति जोडणी रु.७५/- प्रमाणे व दारिद्रय रेषेवरील घरांना प्रतिमाह प्रति जोडणी रु.१००/- प्रमाणे पाणी पट्टी आकारण्यात यावी, असे निर्देश दिले. तसेच वसुलीचे प्रमाण हे साधारणतः ७५ ते ८० टक्के असले पाहिजे. त्या अनुषंगाने प्रस्ताव वरील प्रमाणे सुधारित करुन तद्नंतर होणारा तोटा सहन करणेचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा व सुधारित कार्यक्रम बाब पुढील बैठकीसमोर आणावी. या बाबतची पुढील कार्यवाही करण्याकरिता मुख्य अभियंता, मजीप्रा, पुणे व सदस्य सचिव यांना निर्देश देण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.२१: संरक्षण पाणी पुरवठा केंद्र, साकोरे, ता. निफाड, जि. नाशिक, पाणी पुरवठा केंद्रासाठी पालखेड धरणात अस्तित्वातील उद्भव घेऊन थेट पाईपलाईनव्दारे पाणी पुरवठा करणेबाबत..**

SE (10-06)

सदर कार्यक्रम बाबी विषयी सदस्य सचिव तसेच मुख्य अभियंता, नाशिक यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली असता त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

उपरोक्त प्रस्ताव हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या फयद्याचा असून रु.७५० लक्ष खर्च केल्यास पुढील तीन वर्षात हा सर्व खर्च वसूल होईल असे मुख्य अभियंता मजीप्रा, नाशिक यांनी नमूद केले. सविस्तर चर्चेनंतर प्राधिकरणाचे हित लक्षात घेता संरक्षण पाणी पुरवठा केंद्र साकोरा साठी थेट पालखेड धरणातून पाईप लाईन द्वारे पाणी आणावयाच्या रु.७५० लक्ष किमतीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या साठी एच.ए.एल. या महत्वाच्या व मुख्य ग्राहकाकडून भविष्यातील पाण्याच्या देयकापैकी काही रक्कम अग्रिम म्हणून घेण्यासही मान्यता देण्यात आली. एच.ए.एल. भविष्यातील पाण्याच्या देयकापोटी अग्रिम म्हणून देण्यास तयार न झाल्यास संपूर्ण रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील घसारा निधीतून गुंतविण्यास व आवश्यकते प्रमाणे कर्ज उपलब्ध करुन घेण्यासही मान्यता देण्यात आली. या संबधीची पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास तसेच एच.ए.एल. शी बोलणी तसेच वाटाघाटी करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.२२: ओझर साकोरा व २ गावे प्रा.पा.पु.योजना, ता.निफाड, दिंडोरी, जि. नाशिक. देखभाल व दुरुस्ती म.जी.प्रा.मार्फत करणेबाबत.**

SE (10-06)

सदर कार्यक्रम बाबी विषयी सदस्य सचिव तसेच मुख्य अभियंता, नाशिक यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली असता त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

| | |
|---|---|
| मा. अध्यक्ष तथा | सदस्य सचिव |
| मंत्री, पा.पु. व स्व. | म.जी.प्रा. |

करण्यात आलेले २३५८.७१ लक्ष व आता करावयाचे प्रस्तावित रु.२३५२.३२ लक्ष) नागरी योजनांकरिता प्राप्त झालेल्या अखर्चीत अनुदानातून खर्च करण्यास मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात आली.

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या नागरी पाणी पुरवठा योजना त्वरित कार्यान्वित करता याव्यात. तसेच चालू कामापैकी Priority Component पूर्ण करण्यासाठी हुडको कडून कर्ज मंजूर होईपर्यतच्या कालावधीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे नागरी पाणी पुरवठा योजनांवरील शिल्लक अनुदानातुन रु.४६८४.०३ लक्ष कर्जापोटी हुडकोच्या अटी व शर्ती व व्याज दरापेक्षा १% जास्त अधिक २% शासन हमी शुल्क दराने स्थानिक स्वराज्य संस्थाना ( सोबतच्या विवरणपत्रानुसार) कर्ज म्हणून तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावे. सदर कर्ज एस्क्रो अकाऊंटच्या माध्यमातून वसूल करण्याची व्यवस्था करावी.

२. उपरोक्त १ मधील प्रक्रिया जसे मनपा/नपा चे ठराव, Escrow Account ची पुर्तता इत्यादी बाबी पूर्ण होऊन कर्ज प्राप्त होई पर्यत शिल्लक अनुदानातून प्रस्तावित केल्याप्रमाणे Priority Component पूर्ण करण्यासाठी खर्च करण्यात यावे.

उपरोक्त प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी आवश्यक बाबींची ( करार इत्यादी) पुर्तता करण्यासाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.२४: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००५-०६ चे सुधारीत अंदाजपत्रक सन २००६-०७ चे अर्थसंकल्पीय अंदाज..**

FACAO

सदर कार्यक्रम बाबी विषयी सदस्य सचिव तसेच वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली असता त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमबाबी द्वारे सादर करण्यात आलेल्या सन २००५-२००६ च्या सुधारित अंदाजपत्रकास तसेच सन २००६-२००७ च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

सध्या मजीप्राकडे असलेला प्रगतीपथावरील नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा कार्यभार हा दोन वर्षापूरता मर्यादित असून, तद्नंतर मजीप्रास ई. अँन्ड पी. पोटी मिळणारे उत्पन्न हे कमी होणार आहे. त्यामुळे मजीप्राकडे कार्यरत असलेल्या सुमारे १२००० अधिकारी व कर्मचाऱ्यांचा अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मजीप्राच्या उत्पन्नात

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

भर टाकण्याकरिता शासना मार्फत योग्य ती ठोस पाऊले वेळीच उचलणे गरजेचे असलेबाबत मा. सदस्य सचिव यांनी नमूद केले असता मा. अध्यक्ष महोदय यांनी, मजीप्राचे अस्तित्व टिकविण्यासाठी कोणत्या उपाययोजना अथवा पर्याय आहेत याचा आढावा घेऊन आवश्यक त्या प्रस्तावासह सर्व संबंधितांसमवेत एक बैठक आयोजित करण्यात यावी असे निर्देश दिले.

**कार्यक्रम बाब क्र.२५: अकोला पाणी पुरवठा योनेचे संपूर्ण व्यवस्थापन, देखभाल व दुरूस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबवून ग्राहकांपर्यंत थेट पाणी पुरवठा करणे.**

सदर कार्यक्रम बाब सदस्य सचिव यांनी सविस्तरपणे संचालक मंडळासमोर विषद केली असता त्यावर सखोल चर्चा करण्यात आली. अकोला महानगरपलिकेचे महापौर व उप-आयुक्त यांना देखील सदर चर्चेकरीता निमंत्रित करण्यात आले होते व ते उपस्थित होते. अकोला पाणी पुरवठा योजना ग्राहकांपर्यंत मजीप्रामार्फत चालवावयाची झाल्यास, ही योजना स्वयंसंतूलीत करण्याकरिता महानगरपालिका सध्या आकारत असलेल्या पाणीपट्टीच्या दरात बऱ्याच मोठया प्रमाणात वाढ करावी लागेल असे सदस्य सचिव यांनी नमूद केले. यावर महापौर व उप-आयुक्त, अकोला महानगरपालिका यांनी सध्या आकारत असलेल्या पाणीपट्टीचे दरामध्ये २५% पेक्षा जास्त वाढ नसावी असे सूचविले असता मा. अध्यक्ष महोदय यांनी अकोला महानगरपालिकेतर्फे आकारण्यात येत असलेले दर हे फारच कमी प्रमाणत असून सदर दरात तातडीने सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच जर पाणीपट्टीच्या दरामध्ये सुधारणा केली नाही तर शासन ही योजना मजीप्रास चालविण्यात देईल व मजीप्रा त्यांचे नियमानुसार ही योजना चालवेल असे निर्देश दिले. यावर महापौर व उप-आयुक्त, अकोला महानगरपालिका यांनी याबाबत ८ दिवसांत योग्य तो निर्णय घेण्यात येईल व तद्नंतर शासनास तसेच मजीप्रास अवगत करण्यात येईल असे नमूद केले. अकोला महानगरपालिकेचा निर्णय झ ााल्यानंतर या योजनेविषयी योग्य तो निर्णय घेण्याकरिता आवश्यक ती कार्यक्रम बाब पढील बैठकीसमोर सादर करण्यात यावी असे ठरले.

संचालक मंडळासमोर चर्चेकरिता आणखी विषय नसलेमुळे उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे मा. अध्यक्ष यांनी घोषीत केले.

Board 100/103 Minutes/56

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.